**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ४१/२०१८-१९/ 255 दिनांक: 20 NOV 2018

**आदेश**

**आदेश केस क्र. ४१(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | सौ. वत्सला श्रीकांत देशमाने<br>अभिषेक निवास पार्श्वनाथनगर सांगली रोड<br>नांदे ता. मिरज जि. सांगली | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>सांगली ग्रामिण भिाग | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग विश्रामबाग | |

**कोरम:-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.बी. बारसिंग, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

आज दिनांक १२.११.२०१८ रोजी या केसची सुनावणी या मंचासमोर घेण्यात आली. यावेळी तक्रारदार सौ. वत्सला श्रीकांत माने, यांच्या वतीने श्री स्वानंद मनवे हे उपस्थित होते. तसेच म.रा.वि.वि.कंपनीकडून श्री के. एच.चव्हाण उपकार्यकारी अभियंता आणि श्रीमती आर.बी. घोरपडे, कनिष्ठ अभियंता हे उपस्थित होते.

तक्रारदाराचे थोडक्यात म्हणणे असे की, सौ. वत्सला श्रीकांत देशमाने या नावाने शेती पंपाला विज कनेक्शन मिळण्यासाठी फेब्रुवारी -२०१८ रोजी Ag.DDF या स्कीम अंतर्गत विज मागणीचा अर्ज दिला होता. तरी माझ्या अर्जावर आज रोजी पर्यन्त समाधानकारक कार्यवाही करण्यात आली नाही. आज रोजी पर्यन्त मला मंजूरी मिळून कोटेशन मिळणे अपेक्षित होते. तरी अद्याप मला कोटेशन मिळाले नाही.

वरील सर्व गोष्टींचा विचार केला असता मला विज कनेक्शन मिळण्यास दिरंगाई झाली आहे हे स्पष्ट होत आहे. तरी याबाबत मला योग्य ती भरपाई मिळावी व दोषी अधिका-यावर योग्य ती कारवाई व्हावी ही विनंती.

वि.वि.कंपनीचे म्हणणे असे की, सौ. वत्सला श्रीकांत देशमाने, रा, नांद्रे, ता.मिरज जि. सांगली यांचा शेती पंपासाठी विद्युत मागणी अर्ज दिनांक ०३.०५.२०१८ रोजी शाखा कार्यालय नांद्रे येथे सादर करण्यात आला. सदर दिवशी अंदाजपत्रक बनवून उपविभागाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आले. सदरचे अंदाजपत्रक ग्राहकाच्या मागणी वरुन सुधारणा (Revised) करण्यासाठी परत शाखा कार्यालयाकडे दिनांक ०९,मे,२०१८ रोजी पाठविण्यात आले.

२) सदरचे अंदाजपत्रक उपाविभागाचे सुचनेप्रमाणे सुधारीत करुन उपविभागाकडे दिनांक १७.०५.२०१८ रोजी पाठविण्यात आले.

३) सदरचे अंदाजपत्रक १९ मे, २०१८ रोजी विभागीय कार्यालय ग्रामिण येथे मंजूरीसाठी पाठविण्यात आले.

४) विभागीय कार्यालय, ग्रामिण यांचे पत्र क्रमांक ३०६५ दिनांक २१.०६.२०१८ अन्वये सदरचे अंदाजपत्रक एजी डी.डी.एफ. योजना स्थगित झाल्यामुळे उपविभागीय कार्यालयास परत पाठविण्यात आले. तसेच त्याची एक प्रत सौ. वत्सला श्रीकांत देशमांने रा. नांद्रे ता.मिरज जि. सांगली यांना विभागीय कार्यालयाकडून पाठविण्यात आली.

५) सदरचे अंदाजपत्रक या कार्यालयाचे पत्र क्र. १७०८ दिनांक २७.०६.२०१८ अन्वये शाखा कार्यालयास परत पाठविण्यात आले.

६) सदरचे अंदाजपत्रक शाखा कार्यालयात आल्यानंतर ग्राहकास त्याची कल्पना तोंडी स्वरुपात देण्यात आली व शाखा कार्यालयाचे पत्र क्रमांक ५१ दिनांक १७.०७.२०१८ सौ वत्सला श्रीकांत देशमाने यांना देण्यात आले परंतु ग्राहकाने सदरचे पत्र स्विकारले नाही.

७) सदरचे अंदाजपत्रक दिनांक ०१.०९.२०१८ रोजी चालू असलेल्या HVDS योजने अंतर्गत मंजूरीसाठी उपविभागाकडे पाठविण्यात आले. तसेच दिनांक ०३.०९.२०१८ रोजी सदरचे अंदाजपत्रक HVDS योजने अंतर्गत समाविष्ठ केले असल्याची सूचना ग्राहकास शाखा कार्यालयाचे पत्र क्रमांक ७२ दिनांक ०३.०९.२०१८ रोजी देण्यात आली आहे.

८) सदरचे अंदाजपत्रक उपविभागीय कार्यालयात मंजूरी क्रमांक DyEE/VBG/Tech/ Ag.HVDS /२३/१८-१९ दिनांक १०.०९.२०१८ अन्वये मंजूर करण्यात आले.

MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
महावितरण

१२/११

वरील सर्व बाबीचा आणि सुनावणी दरम्यान झालेल्या चर्चेचा विचार करता मंचाचा निष्कर्ष खालील प्रमाणे

**मुद्दा क्र.१ :-** तक्रारदाराची मागणी मंजूर करुन विहीत मुदतीत वीज जोडणी व नुकसान भरपाई देता येईल काय?

**उत्तरः-** होय

**मुद्दा क्र.२ :-** अंतिम आदेश खालील प्रमाणे.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १:-** तक्रारदाराने फेब्रुवारी -२०१८ रोजी Ag DDF या योजने अंतर्गत वीज मागणी अर्ज दिला होता. असे सांगितले तरी तक्रारदाराच्या सदर अर्जावर कोणतीही कार्यवाही न करता आज रोजी पर्यन्त तक्रारदारास कोटेशन देखील मिळाले नसल्याचे सांगितले परंतु वि.वि.कंपनीने तक्रारदाराचे फेब्रुवारी -२०१८ रोजी विज मागणीचा अर्ज दिल्याचे म्हणणे फेटाळले.तक्रारदार ग्राहकाने सर्वार्थाने म्हणजे आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह दिलेला विज जोडणी अर्ज नेमक्या कोणत्या तारखेला दिला याचा कोणताही लेखी पुरावा दिला नाही. किंवा फेब्रुवारी-२०१८ रोजी अर्ज दिल्यानंतर आपल्या वीज मागणी अर्जावर आज अखेर कोणती कार्यवाही केली याबाबत एकही पाठपुराव्याचे लेखी पत्र वि.वि.कंपनीकडे दिलेल्याचे पुरावे दिले नाहीत. केवळ फेब्रुवारी-२०१८ मध्ये ऑनलॉईन अर्ज भरला असे तक्रारदार म्हणतो.

वि.प. कंपनीच्या म्हणण्याप्रमाणे सर्वार्थाने परिपूर्ण असा AG DDF योजने अंतर्गत अर्ज दिनांक ०३, मे-२०१८ रोजी प्राप्त झाला. परंतु तो पर्यन्त AG DDF ही योजना दिनांक २३.०४.२०१८ रोजी संपुष्टात आल्याने सदर योजनेखाली तक्रारदाराचा अर्ज मंजूर करता आला नाही. तक्रारदाराचा सदर अर्ज HVDS या योजनेखाली ग्राहय धरण्यात येऊन त्या योजने अंतर्गत वीज जोडणी तक्रारदारास मंजूर करण्यात आली आहे. या कारणास्तव ग्राहकास अंदाजपत्रक देण्यात आले नाही.

कृती मानकांचा विचार करता परिपूर्ण अर्जावरुन वीज जोडणी देण्यात झालेल्या विलंबाबाबत कोण्तीही सबब कारण किंवा प्रशासकीय अडचणी हयांचा विचार करुन विहित मुदतीत काही सवलत देण्याचे प्रावधान नाही. त्यामुळे वि.प. कंपनीने दिलेल्या कोणत्याही सबबीचा विचार करता येणार नाही. अर्जदाराला त्याने परिपूर्ण अर्ज दाखल केल्यापासून एका विशिष्ट मुदतीत नविन वीज ज़ोडणी मिळण्याचा कायदेशीर हक्क आहे. तो हक्क कोणत्याही सबबी खाली नाकारता येत नाही. सबब तक्रारदाराची तक्रार मंजूर करुन त्याला एका विशिष्ट कालावधीमध्ये नविन वीज जोडणी देण्याचा आणि कृती मानकानुसार झालेल्या विलंबा करिता भरपाई देण्याचा आदेश पारीत करणे आवश्यक आहे. असा या मंचाचा निष्कर्ष आहे.

सबब वरील मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देऊन आम्ही खालील आदेश पारीत करीत आहोत.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM MAHARASHTRA STATE ELECTRICITY D... CO. LTD. महावितरण

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदारास हया आदेशाचे तारखेपासून ३० दिवसाच्या आत नविन वीज जोडणी द्यावी.

३) परिपूर्ण अर्ज दिलेल्या तारखेच्या एक महिन्या पासून म्हणजे दिनांक ०३.०६.२०१८ पासून हया आदेशाच्या तारखेपर्यन्त २१ आठवडयांच्या विलंबाकरीता प्रति आठवडा रु. १००/- प्रमाणे एकूण रक्कम रु.२१००/- इतकी नुकसान भरपाई हया आदेशाच्या तारखेपासून एक महिन्यात द्यावी.

४) आदेशाची पुर्तता झाल्याचे हया आदेशाच्या तारखेपासून ४५ दिवसात या मंचाला लेखी कळविण्याचे आहे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( पी.एस. पुजारी)
ग्राहक सदस्य

(एन.बी. बारसिंग)
सदस्य सचिव

(ए.व्ही. देशपांडे)
अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण